मध्यम प्रकल्प विभाग, आंबडपाल विभागाधिनस्त कार्यरत २ उपविभागीय कार्यालयांच्या विभागीय कार्यालयाच्या संनियंत्रणात बदल करणे.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक : आढावा - २०१७/ प्र.क्र. २९३/ २०१७ / आ.(प्रशि.)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १५ फेब्रुवारी, २०१८.

वाचा : १) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.ईआरडब्ल्यू-१०८३/सीआर-६११/८३/एडीएम-९, दि.८.३.१९८४.
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.१०९२/सीआर/८०६/व्यय-६, दि.१५.१०.१९९२.
३) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. आढावा-१००२/३३५/२००२/आ.(प्रशि.), दि.०६.०२.२००३.
४) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. आढावा-२०१६/प्र.क्र.२९८/२०१६/आ.(प्रशि.), दि.०७.०३.२०१७.
५) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. आढावा-२०१७/प्र.क्र.२५७/२०१७/आ.(प्रशि.), दि.१०.०१.२०१८.

प्रस्तावना-

केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेंतर्गत (PMKSY) महाराष्ट्रातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांच्या कामासाठी निधीची तरतूद उपलब्ध झाली आहे. या योजनेंतर्गत अधीक्षक अभियंता, दक्षिण कोंकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, ओरोस अंतर्गतचे अरुणा, नरडवे व तिलारी या ३ प्रकल्पिय कामांचा समावेश आहे. यापैकी अरुणा व नरडवे या दोन प्रकल्पांचे संनियंत्रण कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग, आंबडपाल या कार्यालयांतर्गतच्या नरडवे प्रकल्प उपविभाग, आंबडपाल आणि तळंबा मोठा पाटबंधारे प्रकल्प उपविभाग क्र.३, आंबडपाल या उपविभागांमार्फत करण्यात येत आहे. तथापि, वरील दोन उपविभागीय कार्यालये वगळून संदर्भिय अ.क्र.५ येथील शासन निर्णयान्वये कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग, आंबडपाल या विभागीय कार्यालयांतर्गतच्या संनियंत्रणाखाली ५ उपविभागीय कार्यालयांचे विभागांतर्गत विलिनीरण करुन विभागीय पथक निर्माण करण्यात आले आहे. सदर प्रकल्पांची कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करावयाची असल्याने, नरडवे प्रकल्प उपविभाग, आंबडपाल आणि तळंबा मोठा पाटबंधारे प्रकल्प उपविभाग क्र.३, आंबडपाल या २ उपविभागीय कार्यालयांचे संपूर्ण संनियंत्रण मंडळांतर्गतच्या कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, ओरोस या विभागीय कार्यालयांतर्गत वर्ग करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यानुषंगाने शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

अधीक्षक अभियंता, दक्षिण कोंकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, ओरोस सिंधुदुर्गनगरी या मंडळ कार्यालयाच्या नियंत्रणाखालील उप अभियंता, नरडवे प्रकल्प उपविभाग, आंबडपाल आणि उप अभियंता, तळंबा मोठा पाटबंधारे प्रकल्प उपविभाग क्र.३, आंबडपाल या २ उपविभागीय कार्यालयांचे संपूर्ण संनियंत्रण अधीक्षक अभियंता, दक्षिण कोंकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, ओरोस अंतर्गतच्या कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, ओरोस या विभागीय कार्यालयांतर्गत वर्ग करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. विभागीय कार्यालयाच्या संनियंत्रणातील बदलामुळे या उपविभागीय कार्यालयांच्या मुख्यालयात कोणताही बदल नसल्याने, सदरहू कार्यालये सध्याच्या ठिकाणीच कार्यरत राहतील.

३. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक ईआरडब्ल्यू -१०८३/सीआर-६११/ ८३/एडीएम-९, दिनांक ८ मार्च, १९८४ मधील तरतूदीनुसार लघु पाटबंधारे विभाग, ओरोस या कार्यालयाचे कार्यकारी अभियंता यांना “आहरण व संवितरण अधिकारी” व दक्षिण कोंकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, ओरोस-सिंधुदुर्गनगरी या कार्यालयाचे अधीक्षक अभियंता यांना “नियंत्रक अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक १०९२/ सीआर/ ८०६/ व्यय-६, दि.१५.१०.१९९२ मधील तरतूदीनुसार विभागास प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार व आंतर वित्त सल्लागार व उप सचिव यांच्या सहमतीने शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१८०२१५१७०७१५१८२७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil Gangaram Gangarkar

Digitally signed by Sunil Gangaram Gangarkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8b2512fdfec4104829bc2f439e33adb2e3f823a285cfade8149e690564bc13f6, cn=Sunil Gangaram Gangarkar
Date: 2018.02.15 17:14:14 +05'30'

(सु. गं. गांगरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा. मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव.
४) मा. मंत्री (खारभूमी) यांचे खाजगी सचिव.
५) मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक.
६) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा.
७) मा. विधानपरिषद/ विधानसभा सदस्य (सर्व).
८) प्रधान सचिव (जसंप्र व विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
१२) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा) मुंबई/नागपूर.
१३) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४) महासंचालक. संकलपन,प्रशिक्षण, जलविद्यान, संशोधन व सुरक्षा, नाशिक.
१५) सर्व कार्यकारी संचालक (महामंडळ कार्यालये)
१६) कार्यकारी संचालक, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
१७) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई.
१९) आंतर वित्त सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

२०) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
२१) अधीक्षक अभियंता, दक्षिण कोंकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, ओरोस-सिंधुदुर्गनगरी.
२२) अधीक्षक अभियंता, ई-प्रशासन मंडळ, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३) कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे.
(उपविभाग कार्यालयांच्या विभागीय संनियंत्रण बदलाची आवश्यक नोंद घेण्यास्तव)
२४) कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभागीय पथक, आंबडपाल.
२५) कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, ओरोस-सिंधुदुर्गनगरी.
२६) उप अभियंता, नरडवे प्रकल्प उपविभाग, आंबडपाल.
२७) उप अभियंता, तळंबा मोठा पाटबंधारे प्रकल्प उपविभाग क्र.३, आंबडपाल.
२८) सर्व अधिकारी व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२९) कार्यासन आस्थापना (प्रशिक्षण) संग्रहार्थ.

****